मा. कोर्ट

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** नाशिक शहर  **P.S. (पोलीस ठाणे):** अंबड  **Year (वर्ष):** 2026

   **FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0643  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/08/2026 04:25 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

   1 **Day (दिवस):** मधले दिवस  **Date from (दिनांक पासून):** 04/08/2026  **Date To (दिनांक पर्यंत):** 06/08/2026

   **Time Period (कालावधी):**  **Time From (वेळेपासून):** 15:57 तास  **Time To (वेळेपर्यंत):** 12:38 तास

   (b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):**  **Date (दिनांक):** 07/08/2026  **Time (वेळ):** 04:25 तास

   (c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):**  **Entry No. (नोंद क्र.):** 008  **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 07/08/2026 04:25 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 0.2 कि.मी.  **Beat No. (बीट क्र.):**

      **(b) Address (पत्ता):** नाशिक महानगरपालिका, सिडको, विभागीय कार्यालयांच्या पार्किंग,

      **(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

      **District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): रुपाली रामू खांडवी

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1987

(d) Nationality (राष ट्रीयत व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, नाशिक, अंबड , नाशिक शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, नाशिक, अंबड , नाशिक शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-8379961020

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | मारुती भिमाजी डोंगरे | | | 1. महाले फार्म,सिडको,नाशिक,प्लॉट नं 01,सर्वे नं 980,Town/Village (शहर / गाव): रो बंगलो नं 1,लक्ष्मीनगर,Tehsil (तहसील): पाण्याची टाकी,राणाप्रताप चौक,Police Station (पोलीस ठाणे): अंबड,District (जिल्हा): नाशिक शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 60,000/रु लाचेची मागणी करुन 60,000/रु (500/रु दराच्या 24 नोटा असे एकुण 12,000/रुपये चलनी नोटा व 500/रु दराच्या 96 अचलनीय नोटा एकुण 48,000/रु अचलनी नोटा) सदर लाचेची रक्कम स्विकारली आहे | 60,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 60,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

गुरनं- 643/2026, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे,
मी रुपाली रामू खांडवी, वय- 39 वर्ष, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक.मो- 8379961020
सरकार तर्फे फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे 1 वर्षापासुन कार्यरत आहे.
दि.04.08.2026 रोजी आम्ही कर्तव्यावर हजर असतानां वरिष्ठांनी कार्यालयात हजर असलेले तक्रारदार अजिज फिरोज तांबोळी यांचेकडे एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हांस आदेशित केल्याने आम्ही मा. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या. नाशिक ग्रामिण, विभाग, नाशिक यांना पत्र देवुन त्यांच्याकडुन श्री. सचिन वसंत शेवाळे व श्री. अरुण आनंदराव चोथमल यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही, दोन्ही पंचांना, आमची, तक्रारदार अजिज फिरोज तांबोळी, रा. प्लॉट नं. जे. 5, नुर आशियाना बिल्डींग, माघ सेक्टर, अशोकवन कॉलनी, भुजबळ फॉर्म, सिडको, नाशिक व सापळा पथक यांची ओळख करुन देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तेव्हा तक्रारदार अजिज तांबोळी यांनी आम्हांस पंचासमक्ष त्यांच्या तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली ती पुढील प्रमाणे -
"मी तसेच माझे भाउ नाजिम व वसिम यांचे नावे असलेल्या मौजे सिडको नाशिक येथे प्लॉट नं. जे. 5, आशियाना बिल्डींग, सिडको, नाशिक येथे सन 2025 मध्ये इमारतीचे बांधकाम केले असुन सदर बांधकामाचा मला पुर्णत्वाचा दाखला मिळला आहे. त्यानंतर मी सदर इमारतीच्या पार्कीगच्या जागेत 3 गाळयांचे बांधकाम केले आहे. त्यानंतर मी नाशिक महानगरपालिका सिडको विभागीय कार्यालयात जावुन सदर बांधकाम केलेल्या गाळयाची घरपट्टीची आकारणी करणे करीता श्री. मारुती डोंगरे, सहाय्यक अधीक्षक यांना सांगितले होते. त्यानंतर श्री मारुती डोंगरे व पानसरे यांनी दि. 02.07.2026 रोजी मी राहत असलेल्या इमारतीच्या जागेवर येवुन मी पार्कीगमध्ये बांधलेल्या गाळयाची पाहणी करुन गाळयाचे मोजमाप केले.

त्यावेळी मारुती डोंगरे साहेबांनी मला सांगितले की, "तुम्ही गाळयांचे अनधिकृत बांधकाम केले असुन गाळयांना नियमित गाळेभाडे पट्टी (मालमत्ता कर)आकारणी करुन देतो, त्याकरीता 70,000/-रु व मागील वेळी इमारतीची घरपट्टी आकारुन दिली त्यांचे बाकी असलेले 10,000/-रु असे 80,000/-रु मला दयावे लागतील. तेव्हा मी गाळयांची नियमित गाळेपट्टी आकारुन देईल." असे सांगुन मारुती डोगरे हयांनी माझेकडे लाचेची मागणी केली आहे. मला मारुती डोंगरे यांना त्यांच्या मागणीप्रमाणे लाच देण्याची मनापासुन इच्छा नाही. परंतु त्यांना पैसे दिले नाही तर ते मी

बांधकाम केलेल्या गाळयांचे नियमित घरपट्टी (मालमत्ता कर) आकारणार नाहीत. माझा त्यांच्याशी कोणताही वाद नसुन त्यांच्याशी उसनवारीचा अथवा इतर आर्थिक व्यवहार नाही.

मी आज दि. 04.08.2026 रोजी मारुती डोंगरे यांची भेट घेण्यासाठी नाशिक महानगरपालिका सिडको विभाग कार्यालयात जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपले विभागामार्फत कारवाई होणेस विनंती आहे. सदरची तक्रार आम्ही व दोन्ही पंचांनी वाचुन सदर तक्रारी अर्जावर सह्या केल्या आहेत.

त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचाना सुचना देवुन तक्रारदार व पंच नं. 01 श्री. सचिन वसंत शेवाळे यांना तक्रारदार यांचे मित्र म्हणुन सहाय्यक अधीक्षक मारुती डोंगरे यांची भेट घेण्यासाठी नाशिक महानगरपालिका सिडको विभागीय कार्यालय, नाशिक येथे तक्रारदार याचेकडे व्हाईस रेकॉर्ड 15.57 वा. सुरु करुन देवुन ला.प्र.विभाग, नाशिक कार्यालय येथुन तक्रारदार व पंच 01 शेवाळे यांना तक्रारदार यांचे दुचाकी क्रं. एम.एच. 15, ई.व्ही. 9392 ने रवाना केले. काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 शेवाळे असे ला.प्र.विभाग, नाशिक कार्यालयात आमचे जवळ परत आले असता, तक्रारदारांकडील व्हाईस रेकॉर्ड 16.49 वा. बंद केले. तेव्हा पंच 01 शेवाळे यांना रवाना केल्यापासुनची हकिगत विचारली असता, त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने आपल्यापासुन रवाना होवुन नाशिक महानगरपालिका सिडको विभागीय कार्यालयातील घरपट्टी/पाणीपट्टी विभाग कक्षात गेलो. तेथे तक्रारदार यांनी समोरच सहाय्यक अधीक्षक डोंगरे बसले असल्याचे इशा-याने मला सांगितले. तेव्हा आम्ही त्यांच्या जवळ गेलो असता, तक्रारदार यांनी डोंगरे यांना नमस्कार केला. तेव्हा तक्रारदार व डोंगरे यांच्यात तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा तक्रारदार यांनी 70,000/-रु जास्त होत असल्याचे सांगितले. चर्चेदरम्यान डोंगरे यांनी मला व तक्रारदार यांना चहा पिण्यासाठी कार्यालयाचे बाहेरील टपरीजवळ घेवुन गेले. तेव्हा डोंगरे यांनी तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडुन 60,000/-रु लाचेची मागणी केली. त्यादरम्यान डोंगरे यांनी माझी विचारपुस केली. त्यानंतर डोंगरे व तक्रारदार यांच्यात पुन्हा चर्चा होवुन चर्चेदरम्यान डोंगरे यांनी अगोदरचेपण 10,000/-रु बाकी असल्याचे तक्रारदार यांना सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी ठिक आहे उदया 60,000/-रु देतो." असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे आपलेकडे दुचाकीने परत आले अशी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हकिगत विचारली असता त्यांनी पंच नं. 01 यांनी कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले तक्रारदार व सहाय्यक अधीक्षक मारुती डोंगरे यांचेतील संभाषण ऐकुण सहाय्यक अधीक्षक डोंगरे यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती 60,000/-रु लाचेची मागणी केल्याची खात्री झाल्याने व उदईक रोजी सदर लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने तसा दि. 04.08.2026 रोजी झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा पंचनामा करण्यात आला.

दि.05.08.2026 रोजी तक्रारदार व पंच यांचेसमवेत आम्ही सापळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी 500/-रु दराच्या 24 नोटा असे एकुण 12,000/-रुपये (चलनी नोटा) हजर केले असुन लाचेच्या सापळयाकामी त्याचेकडे उर्वरित रक्कम उपलब्ध झाली नसल्याने आम्ही कार्यालयात उपलब्ध असलेल्या अचलनीय, नोटा सापळाकामी वापरण्याचा निर्णय घेवुन त्याप्रमाणे 500/-रु दराच्या 96 अचलनीय नोटा एकुण 48,000/-रु असे एकुण 60,000/-रु (चलनी व अचलनी

नोटा) सापळाकामी घेवुन सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही, पंच 02, सापळा पथक असे शासकीय वाहनाने व तक्रारदार, पंच 01 शेवाळे हे तक्रारदारांकडील दुचाकीने ला.प्र.विभाग नाशिक कार्यालयातुन रवाना होवुन टेलिफोन एक्सचेंज जवळ, अश्विन नगर येथे पोहचलो. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 शेवाळे यांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार याचेकडे व्हाईस रेकॉर्डर 16.24 वा. सुरु त्यांना तक्रारदार यांच्या दुचाकीने नाशिक महानगरपालिका, सिडको विभागीय कार्यालय, नाशिक येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 व सापळा पथक असे नाशिक महानगरपालिका, सिडको विभागीय कार्यालय परिसरात आजुबाजुस सापळा लावला. तेव्हा तक्रारदार हे पंच 01 शेवाळे यांचेसह सहाय्यक अधीक्षक डोंगरे यांचे कार्यालयीन कक्षात गेले व थोडयाच वेळात लाच स्विकारण्याचा ठरवुन दिलेला इशारा न करता परत तक्रारदार व पंच 01 शेवाळे हे दुचाकीने पुन्हा टेलिफोन एक्सचेंज जवळ, अश्विन नगर येथे आल्यावर व्हाईस रेकॉर्डर 16.36 वा. बंद केले. आम्ही पंच नं. 01 व तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, दुचाकीने नाशिक महानगरपालिका सिडको विभागीय कार्यालयातील घरपट्टी/पाणीपट्टी विभागात गेलो असता, डोंगरे तेथे नसल्याने तक्रारदार यांनी त्यांना फोन करुन विचारणा केली असता, ते बाहेर असल्याचे सांगुन उदया कॉल करा असे सांगितले. त्यानंतर सदर दिवशी झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा ला.प्र.वि.नाशिक कार्यालयात जावुन सापळा स्थगिती पंचनामा करण्यात आला.

दि. 06.08.2026 रोजी सापळा कारवाईचे आयोजन करुन सापळा स्थगिती कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन ताब्यात घेतलेल्या लाचेची रक्कम ठेवलेले सिलबंद पाकीट काढुन ते पंचासमक्ष फोडुन त्यामधील 60,000/-रु (500/-रु दराच्या 24 नोटा असे एकुण 12,000/-रुपये चलनी नोटा व 500/-रु दराच्या 96 अचलनीय नोटा एकुण 48,000/-रु अचलनी नोटा) सापळा कारवाईकामी वापरण्याची रक्कम बाहेर काढुन सदर रक्कमेची पंचासमक्ष खात्री करुन तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईबाबत तक्रारदार व पंचाना सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही, सापळा पथक, पंच नं. 2 असे शासकीय वाहनाने व तक्रारदार, पंच नं. 01 शेवाळे असे दुचाकीने ला.प्र.वि.नाशिक कार्यालयातुन रवाना होवुन टेलिफोन एक्सचेंज जवळ, अश्विन नगर येथे पोहचलो. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 शेवाळे यांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार याचेकडे व्हाईस रेकॉर्डर 12.18 वा. सुरु करुन तक्रारदार यांच्या दुचाकीने नाशिक महानगरपालिका, सिडको विभागीय कार्यालय, नाशिक येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 व सापळा पथक असे नाािशक महानगरपालिका, सिडको विभागीय कार्यालय परिसरात आजुबाजुस सापळा लावला. तेव्हा तक्रारदार हे पंच 01 शेवाळे यांचेसह नाशिक महानगरपालिका सिडको विभागीय कार्यालय परिसरात भेटले. काही वेळातच तक्रारदार यांनी सहाय्यक अधीक्षक डोंगरे यांचे मो.कार स्विफ्ट एम.एच. 15, डी.एस. 9797 यांचेतुन उतरुन पैसे घेतल्यानंतरचा ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने सहाय्यक अधीक्षक डोंगरे यांना ताब्यात घेवुन व्हाईस रेकॉर्डर 12.38 वा. बंद करण्यात आले. तेव्हा आम्ही पंच 01 व तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारले असता, त्यांनी सदरची लाचेची रक्कम हि डोंगरे यांनी कारच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवण्यास सांगुन ती त्यांनी स्विकारली आहे. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 अरुण चोथमल यांनी लाचेची रक्कम 60,000/-रु ताब्यात घेतली. तक्रारदार यांचा प्रलंबित कामाचा अर्ज डोंगरे यांचे कक्षातुन

ताब्यात घेण्यात आला आहे. त्यानंतर ला.प्र.वि. नाशिक येथे येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा दोन्ही पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशाप्रकारे तक्रारदार यांच्या 3 गाळयांचे अनधिकृत बांधकामाचे गाळयांच्या नियमित गाळेभाडेपट्टी (मालमत्ता कर) आकारणी करुन देण्याच्या मोबदल्यात 70,000/-रु व मागील वेळी इमारतीची घरपट्टी आकारुन दिली त्यांचे बाकी असलेले 10,000/-रु असे 80,000/-रु लाचेची मागणी करुन तेव्हाच गाळयांची नियमित गाळेघरपट्टी (मालमत्ता कर) आकारुन देतील असे सांगुन दि. 04.08.2026 रोजी 15.57 वा. ते 16.49 वा. दरम्यान तडजोडीअंती 60,000/-रु लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व दि. 06.08.2026 रोजी 12.18 वा. ते 12.38 वा. दरम्यान सदर लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याकडुन नाशिक महानगरपालिका, सिडको विभागीय कार्यालयांच्या पार्किंगमध्ये पंचासमक्ष तक्रारदारास गाडीच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवण्यास सांगुन सदर लाचेची रक्कम स्विकारली. म्हणुन माझी, मारुती भिमाजी डोंगरे, वय- 56 वर्ष, सहाय्यक अधीक्षक, घरपट्टी पाणी विभाग, नाशिक महानगरपालिका, सिडको विभाग, नाशिक रा. प्लॉट नं. 01, सर्वे नं. 980, रो बंगलो नं. 1, लक्ष्मीनगर, पाण्याची टाकी, राणाप्रताप चौक, महाले फार्म, सिडको, नाशिक यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे. मा. वरिष्ठांच्या आदेशाने पुढील तपास- पोनि अजय सुर्यवंशी नेम-लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक. यांना दिला .

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):** पोलीस निरीक्षक
AVINASH SATTLIGPPA NADVINKERI

**No. (क्र.):** PI **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Signature valid
Digitally Signed by: ATUL PRAKASH BANTODE
Rank: HC (Head Constable)
Unique No: 92189408046400032
On: 8/7/2026 4:54:20 AM
At PS: AMBAD, NASHIK CITY

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Jagvendrasingh Navaalsingh Rajput

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**